CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : ३०५ वा ▶ गुरुवार दि. ३१ ऑगस्ट २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ४

इंडिया पर्याय, पण एनडीए कडे मोदींशिवाय पर्यायच नाही : ठाकरे

मुंबई । आज मुंबईत इंडिया आघाडीच्या नेत्यांची पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेत शिवसेना पक्षप्रमुख (ठाकरे गट) उद्धव ठाकरे यांनी एनडीएवर टीका केली आहे. भाजप आणि एनडीएवर हल्लाबोल करत उद्धव ठाकरे म्हणाले की, ''एनडीएकडे पंतप्रधानपदासाठी मोदींशिवाय दुसरा पर्याय नाही.'' उद्धव ठाकरे म्हणाले की, आमच्याकडे पंतप्रधानांच्या चेहऱ्यासाठी अनेक पर्याय आहेत, परंतु एनडीएकडे आणखी कोण आहेत? ते म्हणाले, कर्नाटकमध्ये काय घडले ते तुम्ही पाहिले. त्यांना बजरंग बलीला आणावं लागलं. पण देवानेही त्यांना आशीर्वाद दिला नाही.''

अडचणीतील नाशिक जिल्हा सहकारी बँकेला वाचवायचे तर सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे

कर्ज वसुली करताना लहान शेतकऱ्यांना त्रास होणार नाही याची काळजी बँकेने घ्यावी

मंत्री छगन भुजबळ यांचे आवाहन

मुंबई । प्रतिनिधी

अडचणीत असलेल्या नाशिक जिल्हा सहकारी बँकेला वाचवायचे असेल तर सामूहिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे मोठ्या कर्जदारांकडून सक्तीने कर्ज वसुली करणे आवश्यक असल्याचे मत राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले. गेल्या अनेक वर्ष अडचणीत असलेल्या नाशिक जिल्हा सहकारी बँकेबाबत काल मंत्रालयातील सहकार मंत्र्यांच्या दालनामध्ये बैठक पार पडली या बैठकीमध्ये ते बोलत होते.

यावेळी ते म्हणाले, नाशिक जिल्हा सहकारी बँक ही देशातली एक वेळची नावाजलेली बँक होती. या बँकेचे आजही ११ लाख एवढे वैयक्तिक ठेवीदार असून त्याचप्रमाणे एक हजारापेक्षा जास्त संस्थात्मक ठेवी आहेत. एकेकाळी या बँकेचा पत आराखड्यामध्ये दुसरा क्रमांक लागायचा. मात्र, मधल्या काही काळात या बँकेची परिस्थिती बिघडली, सद्यस्थितीमध्ये ही बँक ९०९ कोटी एवढ्या मोठ्या तोट्यात आहे. बँकेला नाबार्डने बँकिंग परवाना रद्द करण्याबाबत सूचित करण्याबाबतची अंतिम नोटीस पाठवली आहे. त्यामुळे बँकेची भांडवल पर्याप्तता वाढविणे गरजचे आहे.

बँकिंग परवाना रद्द करण्याची प्रक्रिया थांबविण्यासाठी जिल्हा बँकेने सर्वंकश क्शन प्लॅन तयार करावा आणि राज्य सरकारने भाग भांडवलाबाबत हमी देऊन हा प्रस्ताव नाबार्डला सादर करावा. असे आदेश सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील यांनी दिले आहे.

याबँकेवर किमान पुढील पाच वर्ष तरी प्रशासकाची नेमणूक कायम ठेवण्यात यावी आणि कर्जदारांना वन टाइम सेटलमेंट करता यावे यासाठी देखील काही प्रयत्न करता आले तर योग्य राहील अशी सूचना देखील ना. भुजबळ यांनी मांडली.

मुंबईत सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या दालनात आयोजित केलेल्या या बैठकीला नाशिकचे पालकमंत्री दादा भुसे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, खा. हेमंत गोडसे, आ. हिरामण खोसकर तसेच सहकार विभागाचे अप्पर मुख्य सचिव राजेश कुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे, विभागीय सहनिबंधक संतोष पाटील, नाबार्डचे महाप्रबंधक रश्मी दरक, नाशिक जिल्हा सहकारी बँकेचे प्रशासक प्रतापराव चव्हाण उपस्थित होते.

न्यूज कॉलम

धुळे कारागृहातील बंदीचा मृत्यू

धुळे । येथील जिल्हा कारागृहातील गंभीर गुन्ह्यातील न्यायाधिन बंदीचा मृत्यू झाला. शामराव उर्फ शाम संभाजी आखाडे (वय ६३ रा. इंदिरा नगर, महिंदळे, साक्री रोड, धुळे) असे त्याचे नाव आहे. काल (ता.२९) दुपारी अचानक छातीत दुखु लागले. कारागृहातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्लयाने तत्काळ श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविदयालयातील रूग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी तपासणी करीत शामराव आखाडे यास मृत घोषित केले. एका गुन्ह्यात तो न्यायाधिन बंदी म्हणून धुळे जिल्हा कारागृहात दाखल होता. रक्षक सुरदास पिंपळसे यांनी दिलेल्या माहितीनुसार शहर पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद झाली.

बसमधून पडल्याने प्रवाशाचा मृत्यू

धुळे । छत्रपती संभाजीनगर येथुन चालक निर्भयसिंग रामसिंग राठोड याने बसने (एमपी१३/एएच ३३३३) प्रवासी घेऊन निघाला. समोरील वाहनाला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न बसचालकाने केला. त्यावेळी बसमध्ये दरवाज्याजवळ बसलेले गोपाल बाबुलाल शर्मा रस्त्यावर फेकले. चालकाने भरधाव वेगात ओव्हरटेक केल्याने हा प्रवासी रस्त्यावर फेकला गेला. त्याचवेळी मागून आलेल्या वाहनाने जोरदार धडक दिली. वाहनाच्या मागील चाकात येवुन गंभीर जखमी झाल्याने गोपाल शर्मा यांचा जागीच मृत्यू झाला. धुळे- चाळीसगाव रोडवरील मोहाडी परीसरात काल (ता.२९) दुपारी घडली. एस.टी.बसचालक निर्भयसिंग राठोड याचे विरूध्द मोहाडीनगर पोलीस ठाण्यात अपघाताचा गुन्हा दाखल झाला.

खबरदार, रामजन्मभूमीबाबत वादग्रस्त बोलाल तर!

विहिंपचा उद्धव ठाकरे गटाला थेट इशारा

नागपूर । प्रतिनिधी

श्रीरामजन्मभूमी लोकार्पण सोहळ्याबाबत उद्धव ठाकरे यांच्या गटातील काही वरिष्ठ नेत्यांकडून केली जाणारी वक्तव्ये ही निंदनीय आणि निषेधार्ह आहेत. त्यामुळे यापुढे रामजन्मभूमीबाबत लोकार्पण सोहळ्याबाबत वादग्रस्त विधाने केल्यास त्यांना विश्व हिंदू परिषद जशास तसे उत्तर देतील, असा इशारा विश्व हिंदू परिषदेने दिला आहे.

विश्व हिंदू परिषदेचे मुंबई क्षेत्र प्रमुख गोविंद्र शेंडे म्हणाले, गेल्या काही दिवसांपासून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या गटाच्या अनेक नेत्यांच्या वक्तव्यातून अगदी स्पष्ट होत आहे की हा पक्ष श्रद्धेय बाळासाहेब ठाकरे यांनी प्रस्थापित केलेल्या आपल्या मूळ हिंदुत्वाच्या विचारधारेपासून कोसो दूर गेला आहे. आज या गटाच्या प्रवक्त्यांनी रामजन्मभूमी लोकार्पण सोहळा हा दंगली घडविण्यासाठी व निवडणुकीत फायदा घेण्यासाठी भाजपने आयोजित केलेला सोहळा आहे, असे वक्तव्य करून श्रीरामजन्मभूमीवर श्रद्धा असणाऱ्या देशातील सर्व साधू संत, श्रीरामभक्त सकल हिंदू समाज व या आंदोलनासाठी असंख्य बलिदान देणाऱ्या विश्व हिंदू परिषद, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व सर्व हिंदुत्ववादी श्रीरामभक्त संघटनांच्या श्रद्धेचा अपमान केला आहे. विश्व हिंदू परिषद याचा तिव्र निषेध करुन राज्य शासनाने यावर उचित कारवाई करावी यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना पत्र लिहिण्यात आले आहे.

उद्धव ठाकरे यांनी मतांच्या जोगव्यासाठी मुस्लीम तुष्टीकरणात आता सर्वांना मागे टाकले आहे असे या प्रकारातून स्पष्ट होते. श्रीरामजन्मभूमी सोहळ्याला कलंक अथवा गालबोट लावण्याचा प्रयत्न केल्यास विश्व हिंदू परिषद श्रीरामभक्त हिंदूंच्या साहाय्याने तो प्रयत्न निष्प्रभ करेल असा इशारा शेंडे यांनी दिली.

महापालिकेत उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाई

दंड ठोठावला, कर्मचाऱ्यांची धावपळ

धुळे । प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या उपायुक्त डॉ. संगिता नांदुरकर यांनी कार्यालयात उशिरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांची आज चांगलीच हजेरी घेत दंड ठोठावला. त्यामुळे कर्मचाऱ्याची धावपळ उडाली. महापालिकेच्या आयुक्तपदी आठवडाभरापूर्वीच श्रीमती अमिता दगडे पाटील यांची नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी मनपात झाडाझडती सुरुवात केली आहे. आयुक्त दगडे-पाटील यांच्या आदेशावरुन कार्यवाही झाली.

महापालिकेच्या आयुक्तपदी आठवडाभरापूर्वीच श्रीमती दगडे पाटील यांची नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांनी मनपात झाडाझडती सुरुवात केली आहे. आयुक्त दगडे-पाटील यांच्या आदेशावरुन आज महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावरच उपायुक्त श्रीमती नांदुरकर यांनी कर्मचाऱ्यांच्या झाडाझडतीस सुरु केली.

त्यात १० कर्मचाऱ्यांकडे मनपाचे ओळखपत्र नसल्याने त्यांना ५० रुपये दंड ठोठावला. ३० कर्मचारी गैरहजर आढळले असून त्यातील काहींनी रजेचे अर्ज दिल्याचे सांगण्यात आले. तर काही कर्मचारी नेहमीच उशिरा येत असल्याने त्यांच्यावरही महापालिका प्रशासनाचे लक्ष असल्याचे श्रीमती नांदुरकर यांनी स्पष्ट केले. दरम्यान महापालिकेतील अनेक कर्मचारी उशिरा येत असल्याने नागरिकांच्या कामांना विलंब होतो त्यामुळे या कारवाईचे अनेक नागरिकांनी समाधान व्यक्त करत आहे. यापुढेही कारवाईस सातत्य असावे, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

सिलिंडरच्या किमतीत कपात; भाजपतर्फे जल्लोष

धुळे । रक्षाबंधनच्या पूर्वसंध्येला घरगुती गॅसच्या किंमतीत २०० रुपयांची घट करुन सर्वसामान्यांना दिलासा दिला, गॅसचे दर कमी करुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रक्षाबंधन भेट दिली दिल्याने भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा जयश्री अहिरराव, जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी आनंद व्यक्त केला.

पक्षाच्या कार्यालयाबाहेर फटाक्यांची आतषबाजी केली, पेढे भरविले, तसेच गॅस सिलेंडरला राखी बांधून औक्षण करीत जल्लोष व्यक्त केला. माजी आ.राजवर्धन कदमबांडे, महापौर प्रतिभा चौधरी, माजी उपमहापौर कल्याणी अंपळकर, सुरेखा उगले, वंदना थोरात, वैभवी दुसाने, आरती पवार, योगिता बागुल, वैशाली शिरसाठ, निशा चौबे, वंदना भामरे, नगरसेवक हिरामण गवळी, भाजपा सरचिटणीस ओम खंडेलवाल, नगरसेवक अमोल मासुळे महेश मुळे, यशवंत येवलेकर, सुहास अंपळकर, विनोद खेमनार, सजन चौधरी आदी उपस्थित होते.

धुळे जिल्हा दुष्काळी जाहीर करा : कदमबांडे

धुळे । प्रतिनिधी

पावसाअभावी जिल्ह्यात दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले असून शेतकऱ्यांसमोर संकट निर्माण झाले आहे. याबाबत शासनस्तरावर पाठपुरावा करून धुळे जिल्हा दुष्काळी परिस्थिती म्हणून जाहीर करावा, अशी मागणी जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनाचा आशय असाः धुळे- नंदुरबार जिल्हा बँकेने लक्षांकाच्या १२३ टक्के पीक कर्जवाटप केले आहे. पीक कर्ज वाटप दिलेल्या लक्षांकानुसार पुर्ण करण्यासाठी जिल्हा बँकेकडे स्वनिधी शिल्लक नसल्यामुळे जिल्हा बँकेने महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून १०० कोटी ९.७५ टक्के व्याजदराने उचल कर्ज घेवुन धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील ६०१ विविध कार्यकारी सहकारी संस्था व आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांना ६ टक्के व्याजदराने शेती पीक कर्ज वाटप केले आहे. कर्ज वाटपापासून मोठ्या प्रमाणावर तोटा होतो. तरी देखील जिल्हा बँक शासनाचा आदेश व शेतकऱ्यांचे हितासह सामाजिक दृष्टीकोन लक्षात ठेवून बँकेने दरवर्षी दिलेल्या लक्षांकापेक्षा जास्तीने पीक कर्ज वाटप करीत आहे. या तुलनेत दोन्ही जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत/व्यापारी बँका मात्र शेतकऱ्यांची अडवणूक करून कर्जवाटप करण्यात कुचराई करीत आहेत. त्यांनी लक्षांकाच्या केवळ २० टक्के पीक कर्ज वाटप केले आहे. पीक कर्ज वाटप हे फक्त सधन शेतकऱ्यांनाच देतात. मात्र जिल्हा बँक, अल्प, अत्यल्प भूधारक यांना देखील पीक कर्ज वाटप करते. जिल्हा बँकेने दिलेल्या लक्षांकापेक्षा ६४.६३ कोटीने जास्तीने शेती पीक कर्जवाटप करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली आहे. यावर्षी मात्र अद्यापही समाधानकारक पाऊस नसल्याने दुष्काळी स्थिती आहे, त्यामुळे जी पिके करपत आहेत, तर काही ठिकाणी पुरेशी पेरणीही नाही, दुष्काळी परिस्थिती पहाता शेतकरी हितासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करून संपुर्ण धुळे जिल्हा दुष्काळी परिस्थिती म्हणून जाहीर करावा, अशी मागणीही श्री. कदमबांडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी धिरज चौधरी उपस्थित होते.

इस्लामपुरा येथील काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ

धुळे । प्रतिनिधी

देवपुरातील प्रभाग क्रमांक ३ मधील इस्लामपुरा गल्ली क्रमांक सहा येथे सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ एमआयएम पक्षाचे धुळे जिल्हाध्यक्ष नगरसेवक नासीर पठाण यांच्या हस्ते नुकतेच झाले. इस्लामपुरा भागातील गल्ल्यांमधील रस्ते अनेक वर्षांपासून खराब झाले होते. त्यामुळे नागरीकांना अडचणी निर्माण झाल्या होत्या. जिल्हाध्यक्ष पठाण, नगरसेविका नाजिया पठाण यांनी महापालिका प्रशासनाकडे पाठपुरावा करून नगरोत्थान निधी मंजूर करून घेतला. या निधीतून ग.नं. ६ जवईवाडा येथे रस्ता काँक्रिटीकरणाच्या कामाचा शुभारंभ आमदार फारुक शाह यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. यावेळी फौज्या भाई, शकूर भय्या मंडपवाले, फकीर महंमद, लल्लू अन्सारी, मुन्ना अन्सारी, अनिस पठाण, फिरोज पठाण, वाहिद जान, शोएब अन्सारी, आबिद हाजी आदी उपस्थित होते.

राजीव गांधी विद्यालयात रक्षाबंधन कार्यक्रम

धुळे । प्रतिनिधी

राजीव गांधी माध्यमिक विद्यालयात (अनमोल नगर देवपूर) मुख्याध्यापक संजय पवार यांच्या अध्यक्षतेखाली रक्षाबंधन कार्यक्रम झाला. विद्यालयातील विद्यार्थ्यांना विद्यार्थीनींनी राखी बांधली. याप्रसंगी मुख्याध्यापक पवार, विद्यालयातील जे. बी. सोनवणे, शालिक बोरसे यांनी रक्षाबंधनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रम प्रसंगी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती एम. आर. पाटील, श्रीमती सुनंदा पाटील यांनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर बंधूना राख्या बांधल्या, विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका व विद्यार्थी उपस्थित होते. सुनील ठाकरे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. के. पी. पाटील यांनी आभार मानले.

पोलिसांना राखी बांधून शिवसेना महिला आघाडी तर्फे रक्षाबंधन

धुळे । प्रतिनिधी

रक्षाबंधनाच्या पूर्वसंध्येला आपल्या बहिणीचेच नाही तर सर्व नागरिकांचे खऱ्या अर्थाने रक्षण करणाऱ्या धुळे जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधीक्षक, अधिकारी व कर्मचारी यांना शिवसेना उत्तर महाराष्ट्र महिला आघाडीतर्फे राखी बांधून रक्षाबंधन साजरी झाली. पोलिस अधीक्षक कार्यालयातील कॉन्फरन्स हॉलमध्ये कार्यक्रम झाला.

शिवसेना उत्तर महाराष्ट्र महिला आघाडीच्या संपर्कप्रमुख शुभांगी पाटील यांच्या संकल्पनेतून राख्या बांधण्याचा संकल्प पूर्ण करण्यात आला. धुळे जिल्हा पोलीस दलातील पोलिस अधिकारी व पोलिसांनाही राख्या बांधण्यात आल्या. पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी आपल्या सांगितले, की शिवसेना महिला आघाडीने या कार्यक्रमाच्या माध्यमातून भावा बहिणीचे नाते जोपासले, पोलिसांवर जो विश्वास दाखवला तो आम्ही कायम ठेऊ, पोलीस आणि नागरिकांमध्ये एक जवळीक आणि विश्वासाचे नाते निर्माण झाल्याचेही सांगीतले.

श्रीमती पाटील यांनी सांगितले, की पोलीस हेच बहिणींचेच नाही तर सर्व नागरिकांचे रक्षण करतात, त्यामुळे या रक्षणकर्त्यांना राखी बांधणे हे आमचे कर्तव्य आहे. जिल्हाप्रमुख हेमा हेमाडे, महानगरप्रमुख जयश्री वानखेडे यांच्यासह पोलिस अधिकाऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. महिला आघाडीच्या पदाधिकारी, प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विद्यालयाच्या दीदी आदी उपस्थित होते.

मतिमंद मुलींच्या बालगृहात सीईओ शुभम गुप्ता यांची राखी पौर्णिमा

गुप्ता यांची अशीही बांधीलकी

धुळे । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम गुप्ता यांनी सामाजिक बांधिलकी जपत श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृहात आज सकाळी सपत्नीक भेट दिली. तेथील मुलींकडून राखी बांधून राखी पौर्णिमा साजरा केली. वरिष्ठ अधिकारी यांची ही एक छोटीशी भेट काही काळासाठी का असेना मात्र त्या अनाथ, मतिमंद मुलींच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करून गेली. भाऊ-बहिणीच्या नात्याला आणखी घट्ट करणारा राखीपौर्णिमा हा सण. या सणाच्या दिवशी प्रत्येक घरातच उत्सुकता आणि आनंदी वातावरण पाहायला मिळते. मात्र, दुर्दैवाने ज्यांच्यावर अनाथ होण्याची वेळ आलेली आहे, त्या चिमुकल्यांनी हा सण कसा साजरा करावा? काही अनाथ मुलींना तर रक्षाबंधन म्हणजे काय असते हे देखील माहीत नसते. अशावेळी सामाजिक उत्तर दायित्व म्हणून धुळे शहरातील श्री संस्कार मतिमंद मुलींचे बालगृह व कार्यशाळा (बालाजी नगर, साक्री रोड) येथे श्री. गुप्ता यांनी बुधवारी सकाळी सपत्निक भेट दिली. येथील अनाथ आणि मतिमंद मुलींसोबत राखी पौर्णिमा सण साजरा केला. इथल्या मुलींनी श्री. गुप्ता यांना राखी बांधली. श्री. गुप्ता यांनी संस्थेतील निवासी गृह, स्वयंपाक गृह, तसेच मुलींच्या शैक्षणिक दिशा प्रकल्पाची व कार्यशाळेतील व्यावसायीक प्रशिक्षण आदीबाबत विचारणा व पाहणी केली. मुलींनी बनवलेल्या विविध वस्तू मुलींकडून श्री. गुप्ता यांना भेट म्हणून देण्यात आल्या. यावेळी त्यांनी संस्थेचे व सर्व कर्मचारींचे कौतुक केले. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन केले. जिल्हा समाजकल्याण अधिकारी मनीष पवार, शिक्षण विस्तार अधिकारी विठ्ठल घुगे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता मालसिंग पावरा, यमुनाई संस्थेचे सुनिल वाघ उपस्थित होते.

न्यूज कॉलम

अर्थसहाय्याच्या ३६४ प्रकरणांना मनपा आयुक्तांची मंजुरी

नाशिक । नाशिक महापालिकेच्या समाज कल्याण विभागाच्या वतीने शहरातील दिव्यांग बांधवांच्या हिताच्या विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्यानुसार प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून शासकीय समितीने एकूण ३६४ प्रकरणांना मंजूर करण्याची शिफारस केली होती. त्यानुसार महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक अशोक करंजकर यांनी या प्रकरणांना अर्थसहाय्यास मान्यता दिलेली आहे. यामध्ये बेरोजगार दिव्यांगांना अर्थसहाय्य योजनेअंतर्गत २७८ प्रकरणात दरमहा तीन हजार रुपये याप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. मतिमंद, बहु विकलांग दिव्यांगांना अर्थसहाय्य योजनेअंतर्गत ८५ प्रकरणात दरमहा तीन हजार रुपये याप्रमाणे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. तसेच कोकलहर इम्प्लांट सर्जरीसाठी एका प्रकरणात पाच लाख रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे, अशी माहिती मनपा समाज कल्याण विभागाचे उपायुक्त प्रशांत पाटील यांनी दिली आहे.

जिल्हा परिषदेत आदर्श गाव कार्यशाळा उत्साहात

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने आदर्श गाव (मॉडेल व्हीलेज) तयार करण्यासंदर्भात उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या निवड झालेल्या ग्रामपंचायतीतील सरपंच व ग्रामसेवक यांची जिल्हास्तरीय कार्यशाळा जिल्हा परिषदेच्या रावसाहेब थोरात सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.अर्जुन गुंडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत डॉ. वर्षा फडोळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पाणी व स्वच्छता दीपक पाटील, गट विकास अधिकारी महेश पाटील, सुहास शिंदे, नयन पाटील, सहायक गट विकास अधिकारी प्रशांत पवार, मुख्यमंत्री फेलो प्रज्ञा कुर्डुकर, मनोज निकम यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यशाळेत नाशिक जिल्हा परिषदेच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या आदर्श गाव (मॉडेल व्हीलेज) उपक्रमाची संकल्पना मांडत ग्रामीण भागाचा शाश्वत विकास करण्याच्या उद्देशाने निवड झालेल्या प्रत्येक ग्रामपंचायतीने लोक सहभागातून गावाचा विकास करावा. असे प्रतिपादन करत ग्रामीण विकासासाशी निगडीत सर्व योजना व लोकहिताचे उपक्रम प्रत्येक गावात राबवावे, याबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांनी मार्गदर्शन केले. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अर्जुन गुंडे यांनी मिशन भगीरथ उपक्रमाबद्दल माहिती देत लोक सहभागातून जल संधारणाचे काम कशा पद्धतीने करता येते याबद्दल माहिती दिली. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रतिभा संगमनेरे यांनी यावेळी महिला स्वयंसहायता समूहाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती, आर्थिक शिस्त तसेच घरकुल योजनांबद्दल सांगितले.

ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ वर्षा फडोळ यांनी ग्रामसभा, ग्रामस्तरीय समिती आणि पंचायत विकास आराखडा, आदर्श गाव (मॉडेल व्हीलेज) संकल्पना कशा पद्धतीने साकारता येईल याबद्दल माहिती दिली. पाणी व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दीपक पाटील यांनी घनकचरा व्यवस्थापन, शाश्वत जलसंधारणाबद्दल माहिती दिली. गट विकास अधिकारी नयन पाटील यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांबद्दल माहिती दिली. सुरगाणा तालुक्याचे गट विकास अधिकारी सुहास शिंदे यांनी ग्रामपंचायत अधिनियम, सुशासनयुक्त ग्रामपंचायत आणि योजनांचे एकत्रीकरण याबद्दल यशोगाथा सांगितल्या. यावेळी ग्रामपंचायत विस्तार अधिकारी, मॉडेल व्हिलेज म्हणून निवड करण्यात आलेल्या ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवक उपस्थित होते.

मॉडर्न हायस्कूल सिडको येथे रेडिओ क्लबच्या माध्यमातून मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न

नाशिक । प्रतिनिधी

रेडिओ विश्वास ९०.८ कम्युनिटी रेडिओ नाशिक वतीने रेडिओ आणि त्यातील करिअर विषयी माहिती करुन देण्याच्या उद्देशाने मॉडर्न एज्युकेशन सोसायटी च्या मॉडर्न माध्यमिक विद्यालय, सिडको शाळेच्या विद्यार्थ्यांसोबत रेडिओ क्लब ची सुरुवात करण्यात आली आहे. ८ वेगवेगळ्या सत्रात विद्यार्थ्यांना रेडिओ बद्दल माहिती करुन देताना आरजे होण्यासाठी आवश्यक पात्रता त्यासाठी करावी लागणारी तयारी,आवाज नियंत्रण, चौफेर वाचन ,देहबोली याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.. सोबतच व्यावसायिक लेखक, साऊंड इंजिनिअरिंग ,एडिटिंग याविषयी प्रात्यक्षिक देण्यात आले. दोन महिन्याच्या कालावधीत प्रत्येक सेशन मध्ये वेगवेगळ्या रेडिओ पैलू बद्दल उत्तम मार्गदर्शन करणाऱ्या माहिती देणाऱ्या रेडिओ क्लबच्या पहिल्या बॅचच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या सहभागाबद्दल सहभागपत्र देवून त्यांना गौरविण्यात आले. ह्यावेळी मॉडर्न हायस्कूल च्या मुख्याध्यापिका संगिता कासारे आणि विद्यार्थी, शिक्षकवृंद आणि रेडिओ विश्वास चे स्टेशन डायरेक्टर डॉ हरी कुलकर्णी, समन्वयक ऋचिता ठाकूर, प्रोडक्शन हेड सागर नागरे आणि आरजे शुभम ह्या वेळी उपस्थित होते. सहभागी विद्यार्थ्यांनी कार्यशाळेतील सहभागाचे अनुभव कथन केले.

मनाला नामस्मरणाने नियंत्रित करणे शक्य : विभूजी महाराज यांचे प्रतिपादन

नाशिक । प्रतिनिधी

मनाची अस्थिरता हेच मानवाच्या दुःखाचे खरे कारण आहे. जीवनात शिस्त, संस्कार आणि योग्यता विकसित करून मनाला नियंत्रित करणे शक्य आहे. परंतु यासाठी अभ्यास महत्वाचा आहे. मन मजबूत आणि एकाग्र केल्यास आपण आपले जीवन बदलू शकतो. हे केवळ नामस्मरणानेच शक्य आहे, असे प्रतिपादन परमश्रध्देय विभूजी महाराज यांनी नाशिकमध्ये केले.

मानव उत्थान सेवा समितीच्या नाशिक-पुणे रोडवरील श्री हंस कल्याणधाम आश्रमात आयोजीत सदभावना संमेलनात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर आश्रमाच्या प्रबंधक साध्वी हिराजी, साध्वी हरिषाजी, साध्वी पंकजाजी, साध्वी मिथिलेशज, महात्मा तुरियानंदजी, महात्मा अनासक्तानंदजी आदी उपस्थित होते. नाशिकसह जळगाव, औरंगाबाद, अकोला, सुरत येथून आलेल्या मानवधर्म प्रेमींनी विभूजी महाराज यांचे हर्षाल्हासात स्वागत केले. प्रवचनात विभूजी महाराज म्हणाले, मनुष्य देह का मिळाला, मानवी जीवनाचे लक्ष्य काय यापासून मानव भरकटतो आहे. त्याचे मन स्थिर नाही. मनाची अस्थिरता हेच त्याच्या दुःखाचे प्रमुख कारण ठरते आहे. हल्ली मनुष्य छोट्या - छोट्या गोष्टींना दुःखी होतो. या सर्व गोष्टींवर मात करून मनाला नियंत्रित करायचे असेल तर त्याला नामस्मरणाने बांधून ठेवायला हवे. मनाला समजावणे, मनाला नामस्मरणाशी जोडणे हा संघर्ष आहे. परंतु सततच्या अभ्यासाने मनाला नियंत्रित करता येते असे विभूजी महाराज म्हणाले. प्रारंभी असा कसा देवाचा देव बाई ठकडा, यमुनेच्या तिरी आज पाहिला हरी, आज आनंदी आनंद झाला यांसारख्या सुमधूर भजनांचा भाविकांनी आनंद घेतला. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत लासलगाव स्विमिंग ग्रुपच्या सदस्यांचे यश

लासलगाव । नाशिक येथे नुकत्याच जिल्हास्तरीय अंतर महाविद्यालयीन जलतरण स्पर्धा पार पडल्या. लासलगाव स्विमिंग ग्रुपचे सदस्य खडक माळेगाव येथील बंधाऱ्यात जलतरणचा सराव करतात.या ग्रुपच्या चौघा विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत चांगली कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.या विद्यार्थ्यांचा खडक माळेगाव बंधारा येथे स्विमिंग ग्रुप च्या वतीने सत्कार करण्यात आला. ५० मीटर फ्री स्टाइल प्रकारात आकाश कोकणे याने प्रथम क्रमांक तर स्मित राऊत याने द्वितीय क्रमांक पटकावला ५० मीटर ब्रेस्ट स्टोक या प्रकारात युवराज बोराडे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला तर ४०० मीटर रिले या स्पर्धेत आकाश कोकणे,स्मित राऊत, युवराज बोराडे व हर्षद कोकणे यांनी प्रथम क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धे साठी निवड झाली आहे.

अंजनेरी ट्रेल अल्ट्रा रन: सिझन ३ स्पर्धा ५ नोव्हेंबरला

स्पर्धेचा टी शर्ट अनावरण सोहळा उत्साहात

नाशिक । प्रतिनिधी

अंजनेरी अल्ट्रा ट्रेल रन म्हणजे अंजनेरी पर्वत आणि भूप्रदेशाच्या पायवाटेवर धावणे जेथे अतिशय आव्हानात्मक आणि चित्तथरारक असते. ही स्पर्धा जिल्ह्यातील ही पहिली व अनोखी स्पर्धा आहे. जी अवघड अशा अंजनेरी पर्वताच्या पायवाटा, टेकडी, लेणी, जंगल अशा सर्व गोष्टींनी व्यापलेल्या अंजनेरी घाटमाथ्यावर येत्या ५ नोव्हेंबरला आयोजित करण्यात आली आहे.

मुळातच नाशिक हे पर्यटनासाठी सर्वार्थाने एक आदर्श ठिकाण आहे. नाशिकचा प्राचीन वारसा सांगणारी स्थळे, येथील हवामान, कृषी, वने ही निसर्ग आणि पूर्वजांनी दिलेली देणगी आहेच. म्हणूनच नाशिक शहराचे पर्यटन वाढवणे व साहसी पर्यटन यांसारख्या बाबतीतही नाशिकचा पर्यटनस्थळ म्हणून विकास व्हावा हा या अंजनेरी ट्रेल अल्ट्रा रन स्पर्धेच्या आयोजना मागचा मुख्य उद्देश आहे.

नाशिकचे माजी पोलीस आयुक्त व सध्याचे महाराष्ट्र महामार्ग वाहतूक पोलिस अतिरिक्त महासंचालक, डॉ रवींद्र सिंगल आणि ग्रेप काउंटीचे संचालक तेजस चव्हाण यांच्या संकल्पनेतील अंजनेरी अल्ट्रा ट्रेल चा यंदाचा हा तिसरा सिझन असून 'अंजनेरी अल्ट्रा ट्रेल' च्या तिसऱ्या सिझन साठीचा टी शर्ट अनावरण सोहळ्याचे नुकतेच आयोजन करण्यात आले. दरम्यान स्पर्धेच्या तिसऱ्या पर्वाची तारखेची देखील घोषणा करण्यात आली.

यावेळी डॉ रवींद्र सिंगल यांनी ही स्पर्धा आयोजित करण्यामागचा उद्देश व संकल्पना मांडली. तेजस चव्हाण यांनी स्पर्धेचे स्वरूप, थीम याबद्दलची माहिती दिली.

त्यानंतर नाशिक विभागाचे विभागीय आयुक्त राधाकृष्ण गमे, आयकर आयुक्त अमित सिंग, सहाय्यक आयकर आयुक्त जसकंवल सिंग, क्रेडाई नाशिक मेट्रोचे अध्यक्ष कृणाल पाटील, डॉ. सुधीर संकलेचा, डॉ. महेंद्र महाजन, सुयश हॉस्पिटलचे संचालक डॉ. हेमंत ओस्तवाल, नाशिक सायकलीस्ट फाउंडेशनच्या उपाध्यक्ष् डॉ. मनीषा रौंदळ या मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचा टी शर्ट अनावरण सोहळा उत्साहात पार पडला.

अंजनेरी अल्ट्रा ट्रेल स्पर्धे त सर्व नाशिककरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.

स्पर्धेचे स्वरूप व माहिती

- स्पर्धेची दिनांक: रविवार ५ नोव्हेंबर २०२३
- स्पर्धेच्या तिसऱ्या पर्वाची थीम: 'रन फॉर ग्रीन'
- स्पर्धा: १० किलोमीटर, १५ किलोमीटर, ३० किलोमीटर, ५० किलोमीटर.
- स्पर्धेचा मार्ग: ग्रेप काउंटी रिसोर्ट - त्रंबकेश्वर रोड - बेझे फाटा - विवेदा वेलनेस रिसोर्ट - बेझे धरणाच्या बाजूच्या रस्त्याने पुन्हा त्रंबकेश्वर रोड मार्गे ग्रेप काउंटी असा आहे.

नाशिकरोड भाजप मंडळामध्ये स्नेह यात्रा कार्यक्रम उत्साहात

नाशिक । भारतीय जनता पार्टी प्रदेश चिटणीस माधुरी पालवे-पढार यांच्या मार्गदर्शनाखाली नाशिकरोड मंडळामध्ये स्नेह यात्रा कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित नाशिकरोड मंडल अध्यक्ष राजनंदिनी अहिरे, संगीता मतकर, रजनी गजभिये, रेखा मोरे, सोनार, यशोदा पर्वतकर आदी महिला उपस्थित होत्या.

पिके करपू लागल्याने बळीराजा चिंताग्रस्त

लासलगाव । लासलगाव सह निफाड तालुक्यातील खरीप पिकाची अवस्था गेल्या दीड महिन्यापासून पावसाने ओढ दिल्यामुळे वाईट झाली आहे. पावसाअभावी तालुक्यातील बहुतांश गावातील पेरणी झालेले खरीप पिके करपू लागली आहे. पिकाचे हाल बघवत नसल्याने बळीराजाचे भरल्या डोळ्याने लक्ष आभाळाकडे लागले आहे. परंतु आकाशात फक्त ढगांची दाटी होत आहे.प्रत्यक्षात मात्र बरसण्याची चिन्हे दिसत नसल्याने बळीराजा चिंताग्रस्त झाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

नाशिक महापालिकेच्या मुख्यालयातील प्रागंणात राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा

नाशिक । प्रतिनिधी

हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्ताने नाशिक महापालिकेच्या मुख्यालयातील प्रागंणात काल राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. यावेळी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले.

याप्रसंगी नाशिक शहरातील विविध खेळाडूंनी आपल्या नाशिक शहराचे देशात नाव उंचविले अशा खेळाडूंचा नाशिक मनपा प्रशासक तथा आयुक्त डॉ.अशोक करंजकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नुकताच जाहीर झालेला २०२३ चा श्री शिव छत्रपती राज्य क्रीडा हा मानाचा पुरस्कार तलवारी बाजीमध्ये जय शर्मा यांना मिळाला त्यांचाही सत्कार करण्यात आला. बद्धिबळ घोडेस्वारी, रायफल शूटिंग व एनसीसी आरडी परेडमध्ये सहभाग ईशिता खोंड, दिव्यांग सायकलिस्ट व स्विमर सुनील पवार, अल्ट्रा मॅन व आयर्नमॅन डॉ.सुभाष पवार, ऋचा कुलकर्णी, ऋतुजा पवार, नारायण वाळवेकर, वैष्णवी पवार, रामचंद्र बधान, श्रीपाद गायधनी, मयांक धामणे, भाग्यश्री तांबोळी, साक्षी ताठे तसेच बाळकृष्ण अलई यांनी वयाच्या ८६ व्या वर्षी १० किलोमीटर अंतर वेळेत कापून मॅरेथॉन स्पर्धा जिंकली होती. त्यांचाही सत्कार यावेळी प्रशासक तथा आयुक्त यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नाशिक मनपाच्या विविध जलतरण तलाव येथे कार्यरत असलेले जलतरण प्रशिक्षक, जीवरक्षक यांनी सभासदाचे जीव वाचवून तसेच सभासदांना प्रशिक्षण देऊन, अनेक स्पर्धेत मुलांचा सहभाग करून उत्कृष्ट कामगिरी केलेली असल्याने त्यांचाही सत्कार यावेळी मनपाच्या वतीने करण्यात आला. त्यामध्ये जलतरण तलाव व्यवस्थापक माया जगताप, अनिल निगळ, अरुण पवार, रविंद्र ठाकरे, विकास भडांगे, राजू वाईकर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले. यावेळी प्रशासक तथा आयुक्त डॉ.अशोक करंजकर, उपायुक्त प्रशांत पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता शिवकुमार वंजारी, शिक्षणाधिकारी बी.टी.पाटील, घनकचरा व व्यवस्थापन विभागाच्या संचालिका डॉ.कल्पना कुटे, कार्यकारी अभियंता माळी, उपअभियंता समीर रकटे, निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, महेश आटवणे आदींसह अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

प्रोसेज जमा — ॲड.तुकाराम निंबा मासुळे, धुळे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. मुख्य न्यायदंडाधिकारी सो. यांचे न्यायालयात

फौजदारी कि. अर्ज नं. ६६४/२०२३

शैलेश कमळु बुरुंगले (ठेलारी) उ.व.-३३, कामधंदा-मजुरी, रा.अहिल्याबाई नगर, सोनगीर, ता.जि.धुळे ...**अर्जदार**

।। विरुध्द ।।

म.निबंधक,
जन्म मृत्यु नोंदणी विभाग,
ग्रामपंचायत, सोनगीर, ता.जि.धुळे ... **सामनेवाला**

पुरुषोत्तम शैलेश बुरुंगले यांचा जन्म दिनांक १०/०८/२०१६ व काळु शैलेश बुरुंगले यांचा जन्म दिनांक १५/०१/२०१९

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथिल मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सो. यांचे न्यायालयात दि.२६/७/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज नं. ६६४/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदार याने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १७ प्रमाणे पुरुषोत्तम शैलेश बुरुंगले यांचा जन्म दिनांक १०/०८/२०१६ व मुलगा काळु शैलेश बुरुंगले यांचा जन्म दिनांक १५/०१/२०१९, जन्माची नोंद करणेबाबत धुळे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. ३०/१०/२०२३ हि निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्यास धुळे येथिल मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सो. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदर कामी कोणाची काहीएक हरकत नाही असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर येणा-या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ-धुळे
दि. ३०/०८/२०२३

शिक्का

कामगिरी कारकुन
फौजदारी न्यायालय धुळे

सहाय्यक अधिक्षक,
फौजदारी न्यायालय धुळे

दैवत आरोपीच्या पिंजऱ्यात?

आरोप-प्रत्यारोपांमुळे वातावरण गढूळलेले असतानाच आता समाजमाध्यमांवर देखील रणधुमाळी सुरू होईल. विरोधकांना समाजमाध्यमांवर उत्तर देण्यासाठी एक लाख 'योद्धे' नेमण्याचा निर्णय प्रदेश भाजपने घेतला आहे.

राजकारणात श्रद्धा, निष्ठा याचे काय स्थान असते हे तमाम महाराष्ट्र अगतिकपणे पाहात आहे. आतापर्यंत ज्यांच्याकडून शरद पवार यांचा दैवत म्हणून उल्लेख होत होता त्यांच्याकडून 'दैवता'ला आरोपीच्या पिंजर्यात उभे करण्यात आले. उद्धव ठाकरे यांची शिवसेना विरुद्ध शिवसेनेचा शिंदे गट आणि भाजप यांच्यात माजलेल्या रणकंदनाने राज्यातील वातावरण धुळीने भरले. त्यात खंड पडला नसतानाच आता राष्ट्रवादीतील दादा आणि थोरले पवार असे गट आमनेसामने उभे ठाकले आहेत. माझ्या सहकार्यांनीच मला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष केले, असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात. राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडणूक चिन्ह अजित पवार यांनाच मिळणार, असे त्यांच्या गटाचे नेते आणि आता आतापर्यंत थोरल्या पवारांचे खास निष्ठावान मानल्या जाणार्या प्रफुल्ल पटेलांनी जाहीर करून टाकले. भाजपच्या अथवा त्या पक्षाच्या सोबत असलेल्या नेत्याने काही जाहीर करावे आणि तपास यंत्रणांसह सरकारी यंत्रणांचा त्यानुसार अपेक्षित निर्णय व्हावा, ही एव्हाना प्रथा बनली आहे. शेषन यांच्यासारखी व्यक्ती कधीकाळी मुख्य निवडणूक आयुक्त होती, हे आता आठवावे लागते. पटेल यांनी म्हटल्याप्रमाणे निवडणूक आयोगाचा निर्णय होऊ शकतो. सोमय्यांनी जाहीर केल्यानंतर तपास यंत्रणांकडून कारवाई होते, हे महाराष्ट्राने पाहिले आहे.

अजितदादांनी ऐकलेच नाही !

या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक-अध्यक्ष शरद पवार यांनी केलेल्या विधानांकडे पाहावे लागेल. पक्ष म्हणजे आमदारांची संख्या नव्हे, संघटना महत्त्वाची आणि पक्षात फूट पडलेली नाही, ही त्यांनी घेतलेली भूमिका निवडणूक आयोगाकडून प्रतिकूल निर्णय येऊ नये यासाठी दिसते. मात्र यातून संभ्रम निर्माण झाला. 'अजित पवार आमचेच नेते आहेत', या सुप्रिया सुळे यांच्या वाक्याने गोंधळाला सुरुवात झाली. सुळे यांच्या विधानानंतर स्वागताची भूमिका घेणार्या छगन भुजबळ, धनंजय मुंडे वगैरेंची थोरल्या पवारांच्या स्पष्टीकरणानंतर भलतीच गैरसोय झाली. भुजबळ तर पवारांना आरोपीच्या पिंजर्यात उभे करून मोकळे झाले. तेलगी प्रकरणात गैरव्यवहाराचा आरोप झाल्यावर पवारांनी भुजबळांचा राजीनामा घेतला होता. 'पवारांचे खास शिलेदार' हे बिरुद मिरवणार्या भुजबळांनी गुप्त ठेवलेली ती जखम यानिमित्ताने उघडी पडली! पवारांचे नेतृत्व तर नको; पण ते सोबत आले तर पाहिजे, अशा कसरतीत अजित पवार असल्याने भुजबळांची कडवट टीका त्यांना ऐकूच गेली नाही! पूर्ण महाराष्ट्राने भुजबळ काय बोलले ते ऐकले; पण त्याच व्यासपीठावर बसलेल्या अजित पवार यांना ते ऐकू आले नाही, हा आगळा योग म्हणायचा! मध्यंतरी पवार यांच्या वयाचा संदर्भ देत त्यांनी निवृत्तीचा सल्ला दिला, त्याची उमटलेली प्रतिक्रिया सकारात्मक नव्हती. कदाचित त्यातून ते सावध झाले असावेत. खुद्द थोरल्या पवारांनी, 'वयाबद्दल बोलल्यास महागात पडेल' असे सुनावले होतेच! पवारांचे बोट धरून ज्यांची राजकीय कारकीर्द पुढे गेली त्या दिलीप वळसे यांना, पवार स्वबळावर कधीच सत्तेत आले नाहीत, असा साक्षात्कार नव्या घरोब्यानंतर झाला. श्रद्धा आणि निष्ठेच्या नव्या व्याख्या आपण पाहात आहोत, राजकीय सोयीची गणिते जुळवताना माध्यमांना सामोरे जाताना होणारी नेत्यांची गैरसोय पाहात आहोत. विधानसभा निवडणूक होईपर्यंत ते सुरू राहणार, हे गृहीत धरले पाहिजे. शरद पवार यांच्या सभांना प्रतिसाद मिळत आहे. येवला, बीड, कोल्हापुरात त्यांच्या सभा झाल्या. भाजपमध्ये प्रवेश करताच नेत्यांवरील भ्रष्टाचाराचे आरोप धुवून निघतात. तपास यंत्रणांच्या विश्वासार्हतेवर अशा प्रकारचे प्रश्नचिन्ह पूर्वी लागले नव्हते. कोल्हापूरमधील सभेत पवारांकडून अर्थातच हसन मुश्रीफ यांच्यावरील कारवाईचा विषय निघाला. त्यानिमित्त जितेंद्र आव्हाड आणि मुश्रीफ यांच्यातील वाग्युद्ध पायताणापर्यंत घसरले. सरकारचे कार्यक्रम म्हणजे प्रचार सभेचे मैदान नव्हे. परभणीत 'शासन आपल्या दारी' कार्यक्रमाचे व्यासपीठ विरोधकांवर फैरी झाडण्यासाठी वापरण्यात आले. विधिनिषेधाची पर्वा न करता सामान्यांना दिसेनासे होईपर्यंत राजकीय धुरळा वाढविण्याचा जणू चंग बांधला गेला असावा, असे आजचे चित्र आहे.

मोदींवर आरोप; देशाची बदनामी

अखिल भारतीय काँग्रेसचे माजी अध्यक्ष व काँग्रेसचे पंतप्रधानपदाचे अघोषित उमेदवार खासदार राहुल गांधी यांनी लडाखच्या भूमीवर चीनच्या सैन्याने ताबा घेतला असल्याचे भाष्य करून पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहेच. पण आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची बदनामी करीत आहोत याचे भानही त्यांचे सुटले आहे. राहुल गांधी मोदींवर आरोप करताना ते संयम बाळगत नाहीत. राहुल यांच्या आरोपाने भारतीय सैन्य दलाच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो. राष्ट्रीय सुरक्षा, एकता, अखंडता याला आपण छेद देणारे वक्तव्य करीत आहोत, याचाही त्यांना विसर पडलेला दिसतो. काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून पंतप्रधान मोदींना त्यांचा विरोध असणे समजू शकते. तो त्यांच्या राजकारणाचा भाग असू शकतो. पण मोदींना विरोध करताना देशाची मान खाली जाईल, अशी वक्तव्ये करणे हे राजकीय अपरिपक्वतेचे लक्षण आहे. राहुल तरुण असले तरी त्यांचेही वय वाढत चालले आहे. राहुल गांधी जबाबदार व सशक्त नेता कधी बनणार, असा प्रश्न राजकीय वर्तुळात विचारला जातो आहे.

लडाखच्या जमिनीवर चिनी सैन्याने कब्जा केला आहे, असा राहुल गांधी यांनी जो दावा केला आहे, तो घाईघाईत केलेला दिसतो, एवढेच नव्हे तर कोणताही विचार न करता केलेला आहे, असे म्हणावे लागते. चीनने भारताचा हिस्सा असलेल्या लडाखच्या भूमीवर कब्जा केला हे त्यांना कसे कळले, त्याचा स्रोत काय आहे, त्यांना ही कोणी माहिती दिली? राहुल यांचा पंतप्रधानांवर विश्वास नाही, देशाच्या संरक्षण मंत्र्यांवर विश्वास नाही किंवा परराष्ट्र मंत्र्यांवरही विश्वास दिसत नाही. भारतीय सैन्य दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर किंवा निवृत्त वरिष्ठांवर त्यांचा विश्वास नाही हेच त्यांच्या वक्तव्यातून जाणवते.

दक्षिण ऑफ्रिकेत पंतप्रधान नरेंद्र मोदी व चीनचे अध्यक्ष झिंग जीपिंग हे एकमेकांना भेटत असताना राहुल यांनी चीनने लडाखची हजारो किमी भूमी बळकावली, असा आरोप करीत होते. यामागे त्यांचे काही निश्चितच गणित असावे. पंतप्रधान नरेंद्र मोदी जाहीरपणे सांगतात की, भारताची एक इंचही जमीन कोणीही घेतलेली नाही. सन २०२० मध्ये झालेल्या गलवान धुमश्चक्रीनंतर पंतप्रधानांनी बोलाविलेल्या सर्वपक्षीय बैठकीत, भारताची एक इंचही जमीन कोणीही घेतली नसल्याचे म्हटले होते. पण पंतप्रधान खोटे बोलतात, असा आरोप राहुल गांधी करतात, हे जास्त गंभीर व देशाला धोकादायक आहे. भारतीय सैन्याने कठोर प्रतिकार केल्यामुळे व दाखविलेल्या शौर्यामुळेच गलवान खोऱ्यातून चिनी सैन्याला माघार घ्यावी लागली, असे भाजपचे प्रवक्ते रवि शंकर प्रसाद यांनी त्याच वेळी स्पष्ट केले होते. तरीही चीनने भारताची भूमी बळकावली, असा अपप्रचार राहुल यांनी चालूच ठेवला आहे.

भारतीय सैन्य दलाने पाकिस्तानव्याप्त काश्मीरवर सर्जिकल स्ट्राइक केला किंवा हवाई हल्ले केले होते, तेव्हाही त्यांनी प्रश्न उपस्थित करून पुरावे मागितले होते. भारतीय सैन्य दलाने केलेल्या कारवाईचे पुरावे मागणे म्हणजे त्यांच्या बेजबाबदारपणाचे वर्तन आहे. काँग्रेस पक्षातील ते आज सर्वोच्च नेते आहेत. त्यांनी संरक्षण किंवा परराष्ट्रविषयक मुद्द्यावर बोलताना अतिशय सावधपणे बोलणे अपेक्षित आहे. पण लडाखच्या भूमीवर चीनचा कब्जा, असा आरोप करणे म्हणजे निव्वळ उथळपणा आहे. भारताच्या सरहद्दीवर असलेली चीन व पाकिस्तान ही भारताची शत्रू राष्ट्रे आहेत. भारताच्या विरोधात त्या देशांना मदत होईल किंवा त्यांची प्रशंसा होईल, असे बोलणे कोणत्याही भारतीय नेत्याला शोभादायक नाही. चीनचा जो अर्जेंडा आहे, त्याला पूरक अशी वक्तव्ये करणे देशाला धोकादायक आहे, याचे भान राहुल यांनी ठेवले पाहिजे. डोकलामचा वाद चालू असताना राहुल गांधी हे भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाला न कळवता चिनी राजदूताला जाऊन भेटले होते. जेव्हा त्यांच्या मुलाखतीची जाहीर वाच्यता झाली, तेव्हा आपण वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी चिनी राजदूतांना भेटलो, असा खुलासा त्यांनी केला होता. देशाच्या सरहद्दीवर काय घडले, याची वस्तुस्थिती जाणून घेण्यासाठी शत्रू राष्ट्राच्या राजदूताला भेटणे यापेक्षा बेजबाबदार वर्तन कोणते असू शकते? काँग्रेस आज केंद्रात विरोधी पक्ष आहे. केवळ चार राज्यांत या पक्षाची सत्ता आहे. लोकसभेत विरोधी पक्ष म्हणून या पक्षाला अधिकृत मान्यता मिळविण्याइतपतही खासदार नाहीत. राज्यसभेत मात्र हा पक्ष मान्यताप्राप्त विरोधी पक्ष आहे. मग या पक्षाच्या सर्वोच्च नेत्याने जबाबदारीने बोलायला नको का? भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवर अडचण होईल असे प्रश्न विचारून किंवा आरोप करून राहुल गांधी यांना काय साध्य करायचे आहे? राहुल गांधी यांना चीनला सहानुभूती मिळावी असे वाटते का? राजीव गांधी फाऊंडेशनला चीनकडून देणगी मिळविण्याची खरोखरच गरज पडली होती का? सन २००८ मध्ये बिजिंग दौऱ्यावर असताना सोनिया गांधी व राहुल गांधी यांनी तेथे कम्युनिस्ट पक्षाबरोबर काय चर्चा केली? कोणते समझोते केले हे देशाला समजेल का?

जवाहरलाल नेहरू यांच्या पंतप्रधापदाच्या कारकिर्दीत चीनने तिबेटवर कब्जा केला आणि १९६२ ला भारतावर युद्ध लादून भारताचे मोठे नुकसान केले, याचा राहुल गांधी यांना विसर पडला का? नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान झाल्यापासून चीनलाच काय पण कोणत्याही देशाला भारताकडे वाकड्या नजरने बघण्याची हिम्मत झालेली नाही. चीनला वेळोवेळी त्याची जागा दाखवून देण्याचे काम भारताने केले आहे. एकीकडे नरेंद्र मोदी यांची जगात विश्वनेता म्हणून प्रतिमा निर्माण झाली असताना व ते ब्रिक्स परिषदेत चीनच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर चर्चा करीत असताना चीनने भारताच्या लडाख प्रांताची जमीन हडप केली, अशी आवई राहुल यांनी उठवणे यामागे त्यांची व काँग्रेस पक्षाची कोणती कुटनिती आहे?

देशाची जनता नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांच्यातील फरक चांगला जाणून आहे. चीन किंवा पाकिस्तानला ऊर्जा मिळेल अशी वक्तव्ये करून मोदींना प्रश्न विचारणे किंवा आरोप करणे वा पुरावे मागणे यातून देशाची बदनामी होत असते हे राहुल यांना समजत नसावे का? गलवान खोऱ्यात भारतीय सैन्य व चिनी सैनिकांत झालेल्या धुमश्चक्रीबाबत राहुल यांनी ज्या पद्धतीने प्रश्न विचारले ते आपल्या सैन्याच्या शौर्यावर आणि बलिदानावर संशय घेणारे होते. आंतरराष्ट्रीय प्रश्न पंतप्रधान मोदींनी अत्यंत मुत्सद्दीपणे हाताळले आहेत. दुसरीकडे राहुल गांधी यांचा त्यात उथळपणा जगापुढे प्रदर्शित झाला आहे. राहुल गांधी यांच्या मनात मोदी, अमित शहा, भाजप, संघ परिवार यांच्याविषयी द्वेष आहे. त्यांच्या आरोपातून आणि वक्तव्यातून तो वेळोवेळी प्रकट होतो आहे. राहुल यांच्या आरोपांनी मोदी यांच्या जागतिक प्रतिमेवर काहीही परिणाम होणार नाही, उलट ते किती अपरिपक्व नेते आहेत, हेच जगापुढे येत आहे. राहुल गांधी आणि सोनिया गांधी हे पक्षाच्या कोणत्याच पदांवर नाहीत. पण कोणतेही पद नसताना पक्ष संघटनेची सूत्रे ही त्यांच्या हाती आहेत. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे जरी असले तरी सोनिया व राहुल यांनी हिरवा झेंडा दाखविल्याशिवाय ते कोणताच महत्त्वाचा निर्णय जाहीर करू शकत नाहीत. गांधी परिवाराशिवाय पक्ष चालू शकत नाही, ही काँग्रेस पक्षाची असहाय्यता आहे. मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार कमजोर व्हावे आणि मोदी यांच्या जागतिक प्रतिमेला तडे जावेत, असा काँग्रेसकडून वारंवार प्रयत्न होत असतो. पण त्यात काँग्रेस आणि राहुल गांधी हेच उघडे पडतात हे वेळोवेळी दिसून येते. मोदी सरकारने गेल्या साडेनऊ वर्षांत जे चांगले काम केले, ते काँग्रेसला दिसत नाही. देशात सर्वच वाईट चालले आहे, देशात सर्वत्र अंधार आहे, असे समजून काँग्रेस पक्ष नरेंद्र मोदींना, त्यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकारला व भाजपला विरोध करीत आहे.

- इंडिया कॉलिंग: डॉ. सुकृत खांडेकर

गोव्याच्या पर्यटन उद्योग क्षेत्रावर सकारात्मक परिणाम

जी-२० च्या निमित्ताने राज्याची हवाई प्रवासाबाबतची परस्पर जोडणी अधिक सुधारल्यामुळे या परिषदेसाठी येणाऱ्यांची सोय तर झालीच, पण त्यासोबतच, आराम करण्यासह, साहसी पर्यटन एकाच ठिकाणी करता येईल अशा ठिकाणाच्या शोधात असलेल्या पर्यटकांनाही यादृष्टीने अधिक सोयीस्कर असे गोव्यासारखे नवे ठिकाणही मिळाले. या सगळ्याच्या बरोबरीनेच राज्याला 'देखो अपना देश' या मोहिमेचा राज्यांतर्गत आणि राज्याशी जोडलेल्या ठिकाणांच्या आनुषंगानेही प्रचार प्रसारही करता आला.

भारताकडे आलेल्या जी-२०च्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात, शाश्वतता आणि पर्यावरण संवर्धनाच्या संकल्पनांवर व्यापक चर्चा करण्याची मोठी संधी उपलब्ध झाली. महत्त्वाचे म्हणजे या संकल्पना गोव्याच्या पर्यटनविषयक दीर्घकालीन उद्दिष्टांशी सुसंगतच आहेत. या परिषदेच्या निमित्ताने जागतिक नेत्यांनी जगासमोरची आव्हाने, शाश्वत पर्यटन पद्धती यावर विस्तृत चर्चा केली. त्यामुळे स्वाभाविकपणे विकासाची जबाबदारीपूर्वक प्रक्रिया राबवण्याची गरजही अधोरेखीत झाली. या बैठकांमध्ये पर्यावरणविषयक जाणिवांवर भर दिला गेला. खरे तर ही बाब गोवा सरकारकडून गोव्याच्या अंतर्गत भागात समूह पर्यटनाशी जोडून, पर्यावरण संवर्धनासह पर्यटन वाढीसाठीच्या प्रयत्नांत समतोल राखण्यासाठी राबवल्या जात असलेल्या उपाययोजनांशी सुसंगतच होती. यामुळे गोव्यातील नद्यांसह इथले पर्यटनविषयक वैविध्यपूर्ण अंतरंग अनुभवण्यासाठी मोठ्या प्रमाणात काँक्रीटच्या वापराची गरजच उरत नाही.

गोवा हे एका अर्थाने भारताची वैविध्यपूर्ण संस्कृती आणि इथल्या परंपरेचे एक प्रकारचे छोटे रूपच आहे. आणि हेच रूप जगासमोर आणण्याची मोठी संधी जी-२० परिषदेने उपलब्ध करून दिली आणि त्याद्वारे परस्पर सांस्कृतिक देवाण-घेवाण आणि संवादासाठी एक अनोखे व्यासपीठही उपलब्ध करून दिले. जी-२० च्या निमित्ताने गोव्यात झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांच्या माध्यमातून, इथली कलात्मक प्रतिभा, स्थानिक कारागिरी आणि पाकसंस्कृतीचा अनुभव आंतरराष्ट्रीय समुदायाला घेता आला. सांस्कृतिक देवाण-घेवाणीच्या बाबतीत वाढलेल्या उत्सुकतेने गोव्याच्या पर्यटन क्षेत्रातही वैविध्यता आली. समुद्रकिनारे आणि नाईटलाईफच्या पलीकडे जात इथे येणारे पाहुणे हे स्थानिक समुदायांशी संवाद साधता येऊ शकेल, त्यांच्या प्रथा पारंपरा जाणून घेता येऊ शकेल, साओ जोआओ - चिकालो अशा राज्यातल्या चैतन्यपूर्ण उत्सवी सोहळ्यांमध्ये रमून जाता येऊ शकेल अशा प्रकारचा निर्भेळ आनंद अनुभवण्याचा प्रयत्न करू लागले. एका अर्थाने केवळ प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन घडवण्याच्या पारंपरिक पर्यटन धोरणाऐवजी, प्रायोगिक पर्यटनाकडे लक्ष देण्याच्या दिशेने झालेल्या या बदलांनी इथे आलेल्या पर्यटकांना समृद्ध अनुभव तर मिळालाच, पण त्यासोबतच स्थानिक अर्थव्यवस्थेतही सकारात्मक योगदानाची मोठी भर पडली.

गोव्यात जी-२० समूहाच्या चौथ्या पर्यटनविषयक कार्यकारी गटाची बैठक आणि पर्यटनविषयक मंत्रिस्तरीय बैठकीच्या बरोबरीनेच, २१ जून रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिना'चा योगही जुळून आला होता. यानिमित्ताने गोवा सरकारने राजभवनात विशेष योग सत्राचे आयोजनही केले होते. या सत्रात सर्व देशांचे पर्यटनमंत्री आणि प्रतिनिधींना योगाभ्यासाचा अभूतपूर्व अनुभव घेतला. या विशेष सत्रामुळे त्यांना बैठकांमुळे सतत व्यस्त राहून कराव्या लागत असलेल्या कामांच्या दरम्यान शांततामय वातावरण आणि मनः शांतीचा क्षण अनुभवता आला. खरे तर या सत्राने पर्यटन उद्योग क्षेत्रात आरोग्यविषयक उपचार पद्धतींचा समावेश करण्याच्या गरजेचे महत्त्व तर अधोरेखित केलेच, त्यासोबतच आरोग्यविषयक सर्वसमावेशक दृष्टिकोनाचे महत्त्वही जगासमोर आणले. (लेखक गोवा सरकारच्या पर्यटन, माहिती तंत्रज्ञान तसेच इलेक्ट्रॉनिक्स आणि दूरसंवाद या विभागांचे मंत्री आहेत)

समाप्त:

- रोहन खंवटे

शब्दकोडे-१६५



आडवे शब्द - १. घोषणा ३. पंडित भीमसेन जोशी यांना मिळालेला सर्वोच्च नागरी सन्मान ६. मान्यतेचा शेरा, शिफारस ९. अफगाण सरदार, सलमान-शाहरूख-आमेर-सैफ इ. मंडळींचे आडनाव ११. फळातील द्रव १२. निवासस्थान १३. भव्य, प्रचंड १४. अंगातील मस्ती, गर्व १५. खलण्याचे साधन १८. हिंदीत क्षण १९. नातवंडांची वाट पाहणारे २०. दारूचा एक प्रकार २१. अनेकांकडून कर्ज घेतलेला २२. बहर, हंगाम २३. शिखंडी रूपात जन्म घेतलेली काशीराजाची कन्या २४. तपामुळे येणारी शक्ती २६. कामदेव २९. शक्ती, बळ, ईर्षा ३१. कैफी, नशा आणणारा ३३. हवेतील थंडावा ३५. कोहळ्यापासून तयार केली जाणारी मिठाई ३८. व्यापारातील मध्यस्थ ४१. बडबड ४३. चांगल्या गाण्यासाठी यांची गट्टी जमावी लागते ४४. तलवारीचे घर ४५. त्वरित, चटकन ४७. हिंदीत शरीर ४८. अवधान ५०. जास्तीत जास्त-कमीत कमी ५३. लहान होडी ५५. सुपारीचा गुण ५६. जंगल ५७. कारवीच्या फुलांसाठी प्रसिद्ध पठार ५९. दिवस ६०. सामान, वस्तू ६१. या वाहनाचे 'पुणेरी' चालक प्रसिद्ध! ६२. पुन्हा पुन्हा ६५. लोक विचार ६७. छापील निवेदन ६८. वेल ७०. ज्वाला, दाह ७१. दृष्टीभेट ७२. शहरातील स्थानिक स्वराज्य संस्था ७६. कार्य ७७. चुणीदार पट्टी ७८. वाकलेला, नम्र ७९. कालाचा महिमा

उभे शब्द - १. भांडणे लावणारा मुनी २. टिपरी नृत्य ३. भ्रम ४. बत्तिशीतील सुळा ५. देह, काया ६. दिवटी ७. काथ्याकूट ८. डोईजड ९. लोणच्यातील चटकदार रस १०. पालिकेतील लोकप्रतिनिधी १३. विरुद्ध, उलटे १६. प्रखर नसलेला, मंद (इंग्रजी) १७. कोल्हापुरची देवी १९. लहानांपासून (थोरांपर्यंत) २३. आतला आवाज २५. अजाण (वय) २७. विश्वासघात २८. श्रेष्ठ पुरुष ३०. घोड्यावरून फेरफटका ३२. मध्यंतरी ३४. रस्ता, मार्ग ३६. मीठ ३७. निश्चित, खात्रीने ३९. संगोपन ४०. अंगावरील बारीक केस ४१. अखबार ४३. अंजनाचा एक प्रकार ४६. नवे कोरे ४८. दार (हिंदी) ५०. मडके ५१. हिंदीत नशीब ५२. हा शब्द पचवणे जड! ५४. अशक्त प्रकृती ५८. पंजाबमधील एक नदी ६०. चौसोपी घरातील मधली खोली ६३. दागदागिने ६४. नाटकातील गाणे ६६. मऊ, तलम कापड ६७. बाज, खाट ६९. राजा हरिशचंद्राची पत्नी ७०. सध्या, सांप्रत काळ ७३. पराभव ७४. क्रिकेटमधील धाव ७५. चुलता

शब्दकोडे १६४ चे उत्तर

आडवे उत्तर -
१.अशोक चव्हाण-छगन भुजबळ ८.शर ९.करडई १०.गजानन १२.तडाग १३.कोरा करकरीत १८.गवगवा १९.टवटवीत २०.लता २२.पातळ २३.रमणी २४.गर २५.नवनीत २७.प्रभात २९.काल ३१.रकमाला ३३.तगर ३५.कापा ३७.राज ३९.मसलत ४१.कट्टी ४२.रीस ४३.अवयव ४४.टकल्या ४५.रत ४६.प्रजाती ४७.भिकारी ४८.दवा ५०.विदेश यात्रा ५३.खापरपणजोबा ५८.वर ५९.सवाल ६१.पणती ६३.गळका ६५.मत ६७.यम ६८.राणी ६९.परतावा ७०.वास ७२.मध ७४.रात ७८.भाई ७७.वर्तमानकाळ, भूतकाळ, भविष्यकाळ

उभे
१.अलगअलग २.चलनवलन ३.छकडा ४.गरगरीत ५.नड ६.भुईकोट ७.बळकट ८.शबरी ११.नग १२.तवा १४.रावणभात १५.रवी १६.कतरण १७.तरुणी २१.तारका २२.पातक २६.नीरज २८.तगमग ३०.लव ३२.मायावती ३४.रस ३५.कातकरी ३६.मकरंद ३७.रास ३८.नवरदेव ४०.लटका ४२.रीतसर ४३.अजा ४६.प्रयाण ४७.भित्रा ४९.वाखाणणी ५१.शरम ५२.कलम ५४.पती ५५.पगार ५६.जोगवा ५७.बाळ ६०.वायआभाळ ६१.पराभव ६४.कावा ६६.तम ६९.पतन ७१.सरळ ७३.धनुष्य ७४.रामा ७५.भात

राष्ट्रीय सेवा भारती -सेवाव्रती: शिबानी जोशी

देशातल्या पीडित, वंचित, गरीब नागरिकांच्या शिक्षण, आरोग्य, सामाजिक न्याय तसेच स्वावलंबन यासाठी वेगवेगळ्या प्रकल्पांच्या माध्यमातून तसेच समर्पित कार्यकर्त्यांच्या सहभागातून सुदृढ, समरस समाज निर्माण करणे या उद्देशाने संघाचे कार्यकर्ते विविध संस्थामार्फत उपक्रम राबवतात. या सर्व संस्थांची एक अपेक्स बॉडी किंवा अम्ब्रेला म्हणून २००३ पासून राष्ट्रीय सेवा भारती ही संस्था कार्यरत झाली. त्यानंतर या संघटनेचा देशाच्या सर्व राज्यांत विविध ठिकाणी शाखा विस्तार झाला. राष्ट्रीय सेवा भारती ही संघटना ८ डिसेंबर २००३ रोजी नोंदणीकृत झाली. आज देशभरात विविध १२४६ संस्था, संघटना राष्ट्रीय सेवा भारतीशी संबंधित असून एक दुसऱ्याच्या सहकार्याने देशभरात सेवाकार्य करायला सेवा भारती त्यांना मदत करत आहे.

राष्ट्रीय विचाराच्या नोंदणीकृत स्वयंसेवी संस्था आणि समर्पित कार्यकर्त्यांच्या सामूहिक प्रयत्नातून देशातील पीडित, वंचित आणि गरीब नागरिकांना शिक्षित करणे, स्वावलंबी बनवणे आणि संस्कारक्षम समाज निर्मिती होण्यासाठी अनेक सामाजिक संस्था, संघटना, छात्रावास, रुग्णालय चालवत आहेत. या सर्व संस्थांना, कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यासाठी मदत करणं हा राष्ट्रीय सेवा भारतीचा उद्देश आहे. राष्ट्रीय सेवा भारती जागरण, सहयोग, प्रशिक्षण आणि अध्ययन या चार आयामांवर भर देऊन समाजाला उन्नत करण्याचे प्रयत्न करणाऱ्या संस्थांना मार्गदर्शन करते. थोडक्यात देशभरात काम करणाऱ्या संस्थांची एक अम्ब्रेला म्हणून तिचं काम चालतं. 'ीरळपशव ेिंहश ीरळपशी' म्हणता येईल, अशा धर्तीवर भारतीच्या कामाचे एक रूप आहे. त्यासाठी कार्यकर्त्यांसाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम सेवा भरती आयोजित करत असते. २००३ या स्थापना वर्षापासूनच राष्ट्रीय सेवा भारतीने सामाजिक संस्थांसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या सामाजिक अध्ययनावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले. उदा. छात्रावासासाठी किंवा मातृछाया प्रकल्पाच्या कार्यकर्त्यांसाठी 'कपॅसिटी बिल्डिंग' व्हाव यासाठी प्रशिक्षण घेऊन अनेक कार्यकर्ते कुशल झाले असून त्यांच्यात गुणात्मक वृद्धीही झाली आहे. प्रशिक्षणाबरोबरच विविध प्रकाराचं साहित्य ही प्रकाशित केले जाते. सध्या राष्ट्रीय सेवा भारतीचे प्रमुख पन्नालालजी आहेत.

क्रमशः

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय**- बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

न्यूज कॉलम

पिंपळादेवी विद्यालयात रक्षाबंधनाचा कार्यक्रम

धुळे । शहरातील मोहाडी उपनगरातील श्री पिंपळादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात रक्षाबंधनाचा कार्यक्रम मुख्याध्यापक आर. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनाने उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक के. आर. सावंत होते. धनश्री डावखर या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. स्काऊट व गाईड विभागाच्या वतीने गाईड मुलींनी स्काऊट मुलांना तर वर्गप्रतिनिधी मुलींनी वर्गप्रतिनिधी मुलांना तसेच शिक्षिका भगिनींनी शिक्षकांना राख्या बांधल्या. तसेच वृक्षांनाही राख्या बांधण्यात आल्या. अध्यक्षीय मनोगतातून उपमुख्याध्यापक सावंत यांनी भावा बहिणीच्या पवित्र नात्या विषयी माहिती सांगून रक्षाबंधनाचे महत्त्व विशद केले.

शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी समिती नियुक्त

धुळे । शासनाच्या सहकार, पणन, व वस्त्रोद्योग विभागाच्या २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयांन्वये सन २०२२-२०२३ या वर्षांत राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या कांद्यास प्रति क्विंटल रुपये ३५०/- व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रती शेतकरी याप्रमाणे अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर तसेच तालुकास्तरावर समिती नेमण्यात आली असल्याची माहिती धुळे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्थाचे मनोज चौधरी यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

शहरातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवा-पालकमंत्री

नाशिक । प्रतिनिधी

शहरातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी रात्री उशिरा पोलिस आयुक्त कार्यालयात बैठक घेतली. यावेळी शहरातील वाढत चाललेल्या गुन्हेगारी प्रकरणी आढावा घेतला.

शहरात वैयक्तिक कारणातून वाढत चाललेल्या गुन्हेगारीचा आढावा नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी घेतला. गेल्या महिन्याभरात काही घटनांनी डोके वर काढल्याने आज शहरातील सर्व विभागांच्या पोलीस निरीक्षकासह पोलिस आयुक्त तसेच उपायुक्तांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली. यावेळी वाढलेली गुन्हेगारी खून, गाड्यांची तोडफोड याबाबत कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दहशत निर्माण करण्याच्या हेतून काही समाजकंटक शहराची कायदा सुव्यवस्था बिघडवत आहेत. या गुन्ह्यांमध्ये आरोपींना कठोरातील कठोर शिक्षा करण्याचे आदेश पालकमंत्र्यांनी दिले आहेत. तसेच शहरात पोलिसांचे कोंबिंग ऑपरेशन वाढविण्याच्या सूचना देखील पालकमंत्री दादाजी भुसे यांनी दिल्या आहेत.

रस्त्यावर पोलिस दिसत नाही ही नागरिकांची तक्रार लक्षात घेवून पोलिसांची गस्त वाढविण्याची सूचना केली आहे. यामुळे येत्या काही दिवसात पोलिसांची विशेष कोंबींग मोहीम हाती घेत कारवाई अजून तीव्र करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी जिल्हाधिकारी, नाशिक ग्रामीण पोलीस अधिक्षक देखील उपस्थित होते

महाराष्ट्राच्या मातीतून 'उद्योग रत्ने' शोधणारे सरकार - पेशकार

नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या उद्योग विश्वात आपल्या कर्तुत्वाने नवनवीन मापदंड निर्माण करणारे अनेक रत्न आहेत. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर देशाच्या औद्योगिक प्रगतीमध्ये स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करणारे असंख्य कर्तुत्व संपन्न उद्योजक आपल्या महाराष्ट्राच्या मातीत आहेत. अशी प्रतिक्रिया भाजप उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रदीप पेशकार यांनी व्यक्त केली आहे.

यंदा प्रथमच महाराष्ट्र शासनाने उद्योग रत्न, उद्योग मित्र, उद्योगिनी व उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार जाहीर करून, उद्योग विश्वाला अत्यंत सकारात्मक व आश्वासक संदेश दिलेला आहे. तुम्ही नवनवीन क्षितीज पार करीत रहा, शासन तुमच्या सोबत आहे, अशी ग्वाहीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादांनी दिलेली आहे.

रतन टाटा यांचा 'उद्योग रत्न पुरस्कार' देऊन गौरव करण्यासोबतच आदर पूनावाला, गौरी किर्लोस्कर व आपल्या नाशिकचे अष्टपैलू उद्योजक विलास शिंदे यांनाही पुरस्कृत केलेले आहे.

भाजपाच्या उद्योग आघाडीचा प्रदेश अध्यक्ष ही जबाबदारी पार पाडताना सरकारच्या प्रयत्नांचा प्रामाणिकपणा, सरकाची गतिमानता, सरकारची क्रियाशीलता, उद्योगांबद्दलची आस्था व घडणारे सकारात्मक बदल अत्यंत जवळून बघतो आहे. सरकार विकासात्मक राजकारणाची कास धरून महाराष्ट्राच्या महाखाणीतून एकेक रत्न बाहेर काढत आहे.

या पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे भाजपा उद्योग आघाडीतर्फे मनःपूर्वक अभिनंदन. या पुरस्कारांपासून प्रेरणा घेऊन भविष्यात महाराष्ट्राच्या मातीत अनेक यशस्वी उद्योजक घडणार आहेत. अशीही प्रतिक्रिया प्रदीप पेशकार यांनी व्यक्त केली असून याबद्दल त्यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आहेत.

सातमाने येथील डाळिंब मंत्रालयात

प्रतिकूल परिस्थितीतही डाळिंब दर्जेदार असल्याने मंत्र्यांकडून कौतुक

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक जिल्हा हा नेहमीच कृषी क्षेत्रात क्रांती करणारा जिल्हा म्हणून पुढे आला आहे. जिल्ह्यात कांदा, द्राक्ष, याबरोबरच डाळींब देखील महत्वाचे पीक आहे. मालेगाव तालुक्यातील सातमाने येथील प्रगतिशील युवा शेतकरी निलेश पवार व त्यांचे सहकारी यांनी मंत्रालयात मंत्री दादाजी भुसे यांच्या समवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व अजित दादा पवार यांची भेट घेऊन त्यांना दर्जेदार डाळिंब भेट दिले.

बदलत्या नैसर्गिक परिस्थितीवर मात करून दर्जे दार शेती उत्पादन मिळवून बाजारपेठेत निलेश पवार यांनी नावलौकिक मिळविला आहे. यावेळी डाळिंबावर येणारे विविध रोग व बाजारपेठेतील भाव याबाबत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याशी निलेश व ना. दादाजी भुसे यांनी चर्चा केली. यावेळी मंत्रिमंडळातील सहकाऱ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही चांगले उत्पादन घेतल्यामुळे शेतकरी मित्रांचे कौतुक करत अभिनंदन केले. तसेच भविष्यात डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांची संख्या वाढविण्यासाठी इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याचे आवाहन देखील मंत्र्यांनी केले.

केंद्रीय विद्यालय आयएसपीमध्ये 'एक भारत श्रेष्ठ भारत' अंतर्गत सांस्कृतिक कला महोत्सव

नाशिक । प्रतिनिधी

केंद्रीय विद्यालय संघटन दिल्ली आयोजित संकुलस्तरीय सांस्कृतिक कला महोत्सव स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. यामधे मुख्य अतिथी आयएसपीचे मुख्य महाप्रबंधक राजेश बंसल यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि स्वागत प्राचार्य दिपक अहिरे यांनी केले.

ओडिसा राज्य मुख्य विषय घेवून यामध्ये समूह नृत्य, समूह गाण, सांस्कृतिक कला कृतीचे दर्शन विद्यार्थ्यांनी सादर केले. या स्पर्धेमध्ये केंद्रीय विद्यालय भुसावळ, जळगाव, वरणगाव, मनमाड, अहमदनगर, ओझर, देवळाली, नाशिकरोड कॅम्प येथील विद्यालयांनी. स्पर्धेत सहभाग घेऊन 'एक भारत श्रेष्ठ भारत' यांचे दर्शन घडवले. याप्रसंगी विद्यालयाचे चेअरमन आणि मुख्य अतिथी राजेश बंसल यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत त्यांचा उत्साह वाढवला आणि कौतुक केले. केंद्रीय विद्यालय आयएसपीने उत्तम आयोजनाबद्दल शिक्षकांची त्यांनी प्रशंसा केली. कार्यक्रमाचा समारोप मनमाडच्या केंद्रीय विद्यालयाचे प्राचार्य सुनील परदेशी यांनी केला.

शंकर सोनुले, मनीष हावर्गे, विनोद धायडे ,संजय गांगुर्डे, राजीव पाटील, योगिता ठाकूर, सुनीता चोबे, अंजली त्रिपाठी, मनीष वाघ, अमित पाटील, सौरभ कुमार, सुरेखा माळी, तुकाराम सोनावणे, लीलाचद किर्वे, प्रवीण देवरे, सतीश बर्जेत्री, नरायान मिस्त्री, अनीला महाजन, सुजाता कर्डिले, पमा आहीरे, दिपाली सोनावणे यांनी कार्यक्रम पूर्ण करण्याकरिता परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजय देशपांडे, भागवत वाघमारे यांनी तर उपप्राचार्य समता जांगडेकर यांनी आभार व्यक्त केले.

स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजी राजे यांच्या येवला दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठक

नाशिक । प्रतिनिधी

स्वराज्य प्रमुख छत्रपती संभाजी महाराज यांचा पुढील दौरा नाशिक जिल्ह्यातील येवला मतदार संघात होणार आहे. या संदर्भात काल येवला येथील शासकीय विश्रामगृहात तालुकास्तरीय आढावा बैठक पक्षाचे महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख करण गायकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

या बैठकीमध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून उत्तर महाराष्ट्र प्रमुख केशव गोसावी, उत्तर महाराष्ट्र सचिव शिवाजी मोरे, राज्य कार्यकारिणी सदस्य विजय वाहुळे, नवनाथ शिंदे, ज्ञानेश्वर थोरात, नाशिक ग्रामीण जिल्हाप्रमुख डॉ. रुपेश नाठे, नाशिक शहर व कसमादे विभाग जिल्हा प्रमुख आशिष हिरे, जिल्हा कार्याध्यक्ष नवनाथ वैराळ, उत्तर महाराष्ट्र प्रमुख महिला आघाडी मनोरमा पाटील, राज्य कार्यकारणी सदस्य पुष्पा जगताप, नाशिक महानगर प्रमुख महिला आघाडी निशिगंधा पवार, आयटी विभाग वैभव दळवी, विष्णूपंत घुगे हे उपस्थित होते.

बैठकीत छत्रपती संभाजीराजे हे 'गाव तिथे शाखा व घर तिथे स्वराज्याचा मावळा' या अभियानांतर्गत स्वराज्य पक्षाचा विस्तार करण्यासाठी १० सप्टेंबरला येवला मतदारसंघाचा दौरा करणार आहेत. या अनुषंगाने येवला मतदारसंघातील साधारणतः ३० गावांमध्ये स्वराज्यच्या शाखा व शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. त्यासंदर्भात तालुक्यातील पदाधिकाऱ्यांना विविध जबाबदाऱ्या निश्चित करून देण्यात आल्या आहेत.

प्रत्येक गावामध्ये तालुक्यातील पदाधिकाऱ्यांनी जाऊन त्या ठिकाणचे नियोजन कसे करावे तसेच गावनिहाय शाखा सदस्यांचे फॉर्म भरून नोंदणी करण्याबाबत मार्गदर्शन केले. तालुक्यातील सध्याचे महत्वाचे प्रश्न, यांसह वर्षानुवर्ष न सुटलेले प्रश्न या संदर्भातली सर्व माहिती येत्या दोन तारखेपर्यंत निश्चित करावी. त्याचबरोबर पक्षाच्या सभेचे ठिकाण या सगळ्या गोष्टींवर काटेकोरपणे नियोजन करण्याच्या सूचना वरिष्ठ पदाधिकाऱ्यां मार्फत देण्यात आल्या.

या बैठकीचे नियोजन या विभागाचे जिल्हाप्रमुख डॉ रुपेश नाठे, ग्रामीण जिल्हा कार्याध्यक्ष नवनाथ वैराळ, येवला तालुका निमंत्रक आदित्य नाईक, गोरख संत यांनी केले होते.

या बैठकीला तालुक्यातील संदीप बरशिले, गोरख कोटमे, तुषार शिंदे, विकी कवाडे, निलेश राऊत, यादव येवले, प्रकाश मस्के, गोकुळ गांगुर्डे, प्रवीण कदम, श्यामसुंदर नवले, संदीप पवार, प्रसाद बानगुडे, रवी मेंगाने, कार्तिक भोसले, आकाश कुलकर्णी, अनिल गळगट, दीपक आरगडे, लक्ष्मण आरखडे, अनिल पाटील, मुकुंद भोसले, गणेश भोसले, ऋषिकेश गाडे, समाधान बानगुडे, सचिन दाने, सुनील बोराडे, रवी घोरपडे, सतीश वाघ, शिवाजी घोरपडे, रोहिदास पवार आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बापूसाहेब डी. डी. विसपूते विद्यालयात क्रिडा दिवस संपन्न

धुळे । 'निरोगी शरीरामध्ये निरोगी मन वास करते...' या उक्तीनुसार निरोगी शरीरासाठी खेळाचे महत्व अनन्यसाधारण आहे. हेच विद्यार्थ्यांना शालेय जीवनात पटवून देण्यासाठी राष्ट्रीय क्रिडा दिवस साजरा करण्यात आला.

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित बापूसाहेब डी. डी. विसपुते माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांची जयंती राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व सांगण्यात आले. त्याचबरोबर प्रसिद्ध हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा जीवन परिचय सांगण्यात आला. त्यानंतर आंतरशालेय हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त वर्गा वर्गांमध्ये हॉलीबॉल चे सामने घेण्यात आले. याचे आयोजन क्रिडा शिक्षक श्री एस. बी. भदाणे यांनी केले होते.

वाघाडी पटेल सीबीएसई स्कूल मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन, ओणम व रक्षाबंधन सण साजरा

शिरपूर । प्रतिनिधी

शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचलित वाघाडी येथील जयश्रीबेन अमरिशभाई पटेल सीबीएसई स्कूल मध्ये २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन, ओणम व रक्षाबंधन सण साजरा करण्यात आला.

हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या जन्मदिनी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला. ऑलिम्पिक मध्ये मेजर ध्यानचंद यांनी भारताला सुवर्णपदक मिळवून दिले. त्यांच्या सुवर्ण आठवणींना विनम्र अभिवादन म्हणून राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा झाला.

प्राचार्या मेघा मुंगसे यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले. त्यानंतर खेळाच्या विविध साहित्याचे पूजन करून नारळ अर्पण केले. कबड्डीचा सामना घेण्यात येऊन विजेता व उपविजेता गटास प्राचार्या मेघा मुंगसे यांच्या हस्ते ट्रॉफी देण्यात आली. ओणम आणि रक्षाबंधन हे सण सुद्धा साजरे करण्यात आले. ओणम सणाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी फुलांच्या आकर्षक रांगोळ्या शाळेच्या प्रांगणात साकारल्या. रंगीत फुलांच्या आकर्षक रांगोळ्या सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होत्या. तसेच विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना राख्या बांधल्या तसेच यावर्षी रक्षाबंधन निमित्त नवीन उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी वृक्षांना राख्या बांधून त्यांचे रक्षण करण्याचा संकल्प घेतला. प्राचार्या मेघा मुंगसे यांनी राष्ट्रीय क्रीडा दिन, ओणम व रक्षाबंधनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक सचिन सिसोदिया यांनी केले. आभार शिक्षिका दिपाली पाटील यांनी मानले.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका सिमरन कौर, सोनाली मामीडवार, सुचिता जैन, अदिती बारी, शितल बाबर, अपर्णा मोकाशी, कला शिक्षक प्रशांत पाटील, प्रदीप पाटील, विशाल माळी, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संयोजन केले.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आंतरराष्ट्रीय पदकप्राप्त खेळाडूंचा सत्कार

नाशिक । प्रतिनिधी

२९ ऑगस्ट राष्ट्रीय क्रिडा दिनानिमित्त शिवसेना नाशिक महानगर क्रिडा सेलच्या वतीने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त गुणवंत खेळाडूंचा सत्कार शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर जिल्हा मायको सर्कल येथे संपन्न झाला. याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, महानगर प्रमुख प्रविण (बंटी) तिदमे, लोकसभा संघटक योगेश म्हस्के, क्रीडा सेल जिल्हाप्रमुख अशोक दुधारे, उप जिल्हाप्रमुख प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, माजी नगरसेवक शामकुमार साबळे, आर. डी. धोंगडे, युवासेना जिल्हाप्रमुख रुपेश पालकर, मध्य विधानसभा प्रमुख रोशन शिंदे, उप महानगर प्रमुख आनंद फरताळे, युवासेना उप जिल्हाप्रमुख विशाल खैरनार, आकाश पवार, महिला आघाडी पश्चिम विधानसभा संघटक अनिता पाटील, मध्य विधानसभा समन्वयक अर्चना मगर, पश्चिम विधानसभा उप महानगर संघटक रंजना सायखिंडीकर, पूर्व विधानसभा उप महानगर संघटक आरती गायखे, समीर देवघरे, क्रीडा शिक्षक आनंद खरे, उदय खरे, आनंद चकोर, प्रवीण घोगरे, तन्मय कर्णिक, दिपक निकम यांच्यासह शिवसैनिक, पुरस्कार्थी खेळाडू उपस्थित होते.

नाशिक हे उद्यानांचे शहर म्हणून सर्वत्र प्रसिध्द असले तरी आता ते खेळाडूंचे शहर म्हणून प्रसिध्द झाले पाहिजे, शहरात खेळाडूंसाठी मैदानांची मोठी कमतरता असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून नाशिक महानगरात नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा संकुल उभारण्यासाठी पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी यावेळी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला शिवसेना महानगरच्या वतीने सर्व क्रीडा शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. तसेच छत्रपती पुरस्कार प्राप्त नाशिकचा तलवार बाजीतील खेळाडू जय शर्मा याचा देखील मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बेस बॉल, तलवारबाजी, जंप रोप, सूर्य नमस्कार, सेपक टकरा, रोल बॉल, सॉफ्ट बॉल, क्रिकेट, कॅरम, टेनिस, वॉलीबॉल, फेन्सिंग, मलखांब क्रीडा प्रकारातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पदक प्राप्त अशा ६० गुणवंत खेळाडूंचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला.

पटेल माध्य व उच्च विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा

शिरपूर । प्रतिनिधी

शहरातील आर.सी.पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य पी. आर. साळुंखे होते. प्रमुख पाहुणे पर्यवेक्षक एन. ई. चौधरी, सुनील पाटील उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या हस्ते क्रीडा साहित्यांचे पूजन करून व श्रीफळ वाढवून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिवसानिमित्त कबड्डी, खो-खो, हॅण्डबॉल, बॅडमिंटन, कॅरम या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी क्रीडा शिक्षक मनोज पाटील, मयुरी भामरे, क्रीडा प्रशिक्षक स्वप्निल मोरे, करण शिंदे, सागर माळी, रुपेश सर, भूषण कोळी, सर्व क्रीडा विभाग कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कबड्डी प्रशिक्षक भूषण चव्हाण यांनी केले. आभार ज्युनियर कॉलेजचे क्रीडा शिक्षक मोहसीन कुरेशी यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.